Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019

Special Issue - 126

# Teaching, Research & Extension in Philosophy : Problems & Prospects



**Guest Editor :**
Dr. Sudhir D. Ingale
I/C Principal
Mudhoji College, Phaltan,
Dist. Satara (MS) India.

**Executive Editors of the Issue :**
Dr. Navnath Raskar
Dr. Sunildatt Gavare

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | पुस्तक निर्मिती : एक ज्ञानयज्ञ | डॉ.वेदप्रकाश डोणगावकर | 135 |
| 33 | तत्त्वज्ञानाची आवश्यकता | डॉ.सुनिलदत्त गवरे | 139 |
| 34 | तत्त्वज्ञान विषय : वास्तव आणि अपेक्षा | डॉ.ग्यानदेव उपाडे | 143 |
| 35 | तत्त्वज्ञानाविषयी विद्यार्थी, पालक, समाज यांची धारणा व तत्त्वज्ञान विषय वाढविण्यासाठी केले जाणारे प्रयत्न | रोहित गायकवाड | 146 |
| 36 | तत्त्वज्ञानाविषयी विद्यार्थी, पालक, समाज यांची धारणा | डॉ.विजय शेंडगे | 149 |
| 37 | मानवी जीवनात तत्त्वज्ञानाचे महत्त्व, समस्या आणि उपाय | सचिन राजपूत | 153 |
| 38 | तत्त्वज्ञान विस्तारातील अडचणी : भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात | कु.स्वाती भोंगळे | 157 |
| 39 | तत्त्वज्ञान अध्यापनातील अडचणी व उपाय | प्रा.एस.पी.मुलाणी | 161 |
| 40 | तत्त्वज्ञान विस्तारासाठी कृती कार्यक्रम | डॉ.किरण सावे | 164 |
| 41 | तत्त्वज्ञान विस्तारासाठी कृती कार्यक्रम | डॉ.सचिन खोकले | 167 |
| 42 | तत्त्वज्ञान विस्तारातील अडचणी व उपाय | प्रा.संजय सोनावणे | 170 |
| 43 | तत्त्वज्ञान विस्तारातील अडचणी व उपाय | डॉ.माधव कांबळे | 173 |
| 44 | तत्त्वज्ञान विषयाची सद्यस्थिती व उपाय | प्रा.अर्चना अरसुडे | 176 |
| 45 | तर्कशास्त्राचे मानवी जीवनातील स्थान | डॉ.सुनिल भोईटे | 178 |
| 46 | अध्यापन पद्धती आणि तत्त्वज्ञान अभ्यास | प्रा.मोनालिसा खानोरकर | 182 |
| 47 | तत्त्वज्ञान शिक्षणाची पूर्व अट : मनाची मशागत | डॉ.सुचित्रा नाईक | 186 |
| 48 | तत्त्वज्ञानाच्या अध्यापनासाठी क्रमिक व संदर्भीय साहित्य निर्मिती | डॉ.मुबीन शेख | 191 |
| 49 | तत्त्वज्ञान विस्तारातील अडचणी | डॉ.अनिल शिंदे | 194 |
| 50 | तत्त्वज्ञानाची अध्यापन पद्धती व तंत्र : कांट आणि रसेल संदर्भात थोडक्यात विचार | प्रा.कृष्णात नगरे | 196 |
| 51 | सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती | प्रा.जयश्री शेंडे | 202 |
| 52 | मानवी जीवनातील शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा विचार | गौरी गायकवाड | 207 |
| 53 | महाराष्ट्रातील तत्त्वज्ञानाच्या अध्ययन – अध्यापन विस्तारीकरणातील भाषाविषयक समस्या आणि उपाय | श्रीनिवास हेमाडे | 211 |
| 54 | वैज्ञानिक संशोधनातील अनिवार्य घटक : सिद्धांत कल्पना | प्रा.विलास टिळेकर | 216 |
| 55 | सॉक्रेटीक मेथड –आजच्या काळात तत्त्वज्ञानातील अध्यापन आणि संशोधनाच्या दृष्टीने महत्त्व | डॉ.एन. के. रासकर | 219 |
| 56 | सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती | प्रा.शितल येरुळे | 223 |
| 57 | सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती | प्रा.वैशाली दिवे | 225 |
| 58 | सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती | डॉ.सखाराम गोरे | 228 |
| 59 | संशोधन विषयाची निवड व महत्त्व | डॉ. प्रभाकर कीर्तनकार | 233 |
| 60 | संशोधन प्रक्रिया : एक दृष्टीक्षेप | श्री विनोद पाटील | 235 |
| 61 | संशोधनातील समस्या निवडीचे महत्त्व | डॉ. तेजश्री रायते | 238 |
| 62 | समाजशास्त्रीय संशोधनातील अडथळे व उपाय | प्रा. हरिदास गावीत | 241 |
| 63 | संशोधनाचे स्वरूप आणि पद्धती | प्रा. संदीप चपटे | 244 |
| 64 | सामाजिक शास्त्र संशोधनातील गुणात्मक अहवाल लेखनाचे महत्त्व | दिनेश शेळके | 248 |
| 65 | सामाजिक संशोधनातील प्रश्नावलीचे महत्त्व | प्रा. एस. डी. पवार | 252 |
| 66 | इतिहास संशोधनातील एक नवीन विचारप्रवाह सबाल्टर्न इतिहास (वंचितांचा इतिहास) | डॉ. संतोष कदम | 256 |
| 67 | संदर्भ सूची व्यवस्थापन | डॉ. जी. पी. वायकोस | 261 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261 | February-2019
Special Issue 126 : Teaching, Research & Extension in Philosophy : Problems & Prospects
UGC Approved Journal

# तत्त्वज्ञान विस्तारासाठी कृती कार्यक्रम

डॉ. किरण जयदेव सावे
प्राचार्य
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर
मो.नं. ९८२३९२५३८२
ईमेल - asthakiran@rediffmail.com

मनुष्य आणि मनुष्येत्तर प्राणी यांच्यामध्ये मुलभूत फरक आहे. विचारशीलता आणि कल्पनाशक्ती हे मनुष्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. किंबहुना विचारप्रक्रिया कायम सुरु असणे हे मनुष्याच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. मनुष्याच्या विचारशीलता या मुलभूत गुणामधूनच तत्वज्ञानाचा जन्म झाला आहे.

तत्वज्ञान मानवी जीवनाला एका वेगळी उंची प्राप्त करून देत असते. तत्वज्ञानामुळेच मानवी जीवनाला व मानवी समाजाला अर्थपूर्णता प्राप्त होते. मानवी समाजाचे अस्तित्व एका वेगळया अर्थाने कायम राहत असते. चांगला माणूस बनणे हे माणसाचे सर्वोच्च ध्येय असले पाहीजे. हे ध्येय गाठण्यासाठी जो एक पायाभूत विचार आवश्यक असतो, तो विचार पुरविण्याचे काम तत्वज्ञान करीत असते. तत्वज्ञानाच्या चिंतनाने मनुष्याच्या विचारांमध्ये तसेच त्याच्या आचारांमध्ये वैचारिक प्रगल्भता आणि जबाबदारीचे भान निर्माण होत असते.

तत्वज्ञान जीवनस्पर्शी असते. ते जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करते. जीवनाला मार्गदर्शक ठरते. त्यामुळे तत्वज्ञानाचा अभ्यास अत्यंत आवश्यक ठरतो. केवळ तत्वज्ञानाचे अभ्यासक, प्राध्यापक, विद्यार्थी यांच्यापुरती हा अभ्यास सिमित न रहाता तो समाजातील विविध घटकांमध्ये रुपांतरीत व्हावा, त्याचा प्रसार व्हावा यासाठी एक निश्चित आणि कालबध्द कृतीकार्यक्रम निर्माण करणे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक ठरते. तत्वज्ञानाच्या विस्तारासाठी ठराविक, एकच एक किंवा साचेबंद अशा प्रकारचा कृतीकार्यक्रम आखणे किंवा सादर करणे आणि तो सर्वांना मान्य होणे कठिण आणि अव्यवहारीसुध्दा आहे. परंतु तत्वज्ञानाच्या अभ्यासकांनी किंवा प्राध्यापकांनी आपआपल्या दृष्टीकोनातून काही कल्पना मूर्त स्वरुपात आणण्याचा प्रयत्न केल्यास तत्वज्ञानाच्या विस्तारासाठी आणि प्रसारासाठी त्याचा निश्चित उपयोग होवू शकतो.

समाजामध्ये तार्किक व चिकित्सक विचारक्षमता, सारासार विवेकबुध्दी, जीवनविषयक सर्वसमावेशक दृष्टीकोन, सर्वांच्याप्रती समत्वभाव आणि वैचारिक प्रगल्भता निर्माण होण्यासाठी तत्वज्ञान विषयाच्या विस्ताराचा कृती आराखडा पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) शिक्षकांचे उद्‌बोधन व प्रबोधन

प्रत्येक विषयाच्या संदर्भात महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी उद्‌बोधन वर्ग आयोजित केले जातात. परंतु विद्यापीठ अनुदान आयोग आणि विविध विद्यापीठे यांनी आयोजित केलेले आणि विषयांच्या प्राध्यापकांसाठी अनिवार्य असलेल्या या उद्‌बोधन वर्गाव्यतिरीक्त तत्वज्ञान विषयाची विद्यार्थ्यांमध्ये कशाप्रकारे आवड निर्माण होईल आणि हा विषय सर्वांपर्यंत कसा पोहोचेल यासंबंधी उद्‌बोधन शिबिराचे आयोजन करणे उपयुक्त ठरु शकते. त्यामाध्यमातून शिक्षकांमध्ये प्रबोधन होवून अनेक शिक्षक या विषयाच्या प्रसारासाठी कार्यरत होवू शकतात. तसेच महाविद्यालयामध्ये किंवा विविध महाविद्यालयातील तत्वज्ञानाच्या काही शिक्षकांनी एकत्र येवून विद्यार्थी आणि शिक्षकांच्या विचारप्रक्रियेला चालना मिळेल,

ISSN : 2348-714
February

अशा प्रकारच्या विशेष मार्गदर्शनपर तत्वज्ञानात्मक वैचारिक कार्यशाळा आयोजित केल्यास त्याचाही लाभ विषयासाठी होवू शकतो.

२) तत्वज्ञानाच्या पुस्तकांचे प्रदर्शन

तत्वज्ञान विषयाची जनजागृती करण्यासाठी व समाजामध्ये याविषयी माहिती पोहोचविण्यासाठी शहरी व ग्रामीण भागामध्ये तत्वज्ञानविषयक वैचारिक पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात यावे. जेणेकरुन त्या माध्यमातून विद्यार्थी व समाजामध्ये संबंधित विषयासंदर्भात उत्सुकता निर्माण होईल. या पुस्तक प्रदर्शनामध्ये विविध वयोगटातील विद्यार्थी आणि नागरिक सहभागी व्हावेत आणि ते अशा प्रकारच्या पुस्तकांकडे आकर्षित व्हावेत यासाठी जाणीवपूर्वक विशेष प्रयत्न तत्वज्ञानाच्या शिक्षकांमार्फत होणे आवश्यक आहे. यामध्ये अशा प्रकारच्या पुस्तक प्रदर्शनाची माहिती वर्तमानपत्रांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचविणे, वाचकांसाठी पुस्तक खरेदीवर विशेष सुट मिळावी म्हणून प्रकाशकांकडे प्रयत्न करणे, सर्वसामान्य शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना काही शिक्षकांच्या किंवा समाजातील इतर आर्थिकदृष्ट्य सक्षम व्यक्तींमार्फत अशा प्रकारची पुस्तके मोफत उपलब्ध करून देणे इ. प्रकारच्या उपाययोजनांची अंमलबजावणी उपयुक्त ठरू शकेल.

३) प्रसिद्ध तत्वचिंतकांच्या विचारांचा परिचय होण्यासाठी प्रसिद्ध विचारवंताच्या व्याख्यानांचे आयोजन.

तत्वज्ञान विषयाच्या प्रसारासाठी या विषयाच्या संदर्भात तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करुन परिसरातील शाळा व महाविद्यालयांना त्याचे निमंत्रण देण्यात यावे. आणि या व्याख्यानाच्या कार्यक्रमाला निवडक शाळांमधील विद्यार्थी उपस्थित रहाण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास शालेय स्तरापासून अनेक विद्यार्थ्यांमध्ये तत्वज्ञान या विषयासंबंधी आवड उत्पन्न होवू शकेल.

४) तत्वज्ञानविषयक साहित्यनिर्मितीसाठी विशेष प्रयत्न.

तत्वज्ञान विषयाच्या साहित्यनिर्मितीसाठी सोप्या आणि ओघवत्या भाषेत अधिक प्रमाणात साहित्यनिर्मिती होणे गरजेचे आहे. सध्या या विषयावरील उपलब्ध असणारे साहित्य निश्चितपणे मौलिक आहेत. परंतु त्यामध्ये अधिक प्रमाणात भर पडणे आवश्यक आहे. प्रसिद्ध तत्वज्ञांचा जीवनपट, त्यांचे विचार, त्यांच्या विचारांचा जगावर झालेला परिणाम, त्या विचारांचे महत्व, त्या विचारांचा आपल्या जीवनामध्ये अंगीकार केल्यास आपल्यामध्ये होणारा बदल इ. अनेक बाबतीत तत्वज्ञान विषयक पुस्तकांची निर्मिती केल्यास या विषयाचा विस्तार होण्यास हातभार लागू शकतो.

५) तत्वज्ञानाच्या माजी विद्यार्थ्यांची संघटना स्थापन करणे.

विषयाच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी त्या विषयाच्या माजी विद्यार्थ्यांसाठी संघटना स्थापन करुन त्या माध्यमातून त्या विषयाच्या संदर्भातील विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्यास ते निश्चितपणे फलदायी ठरू शकते. माजी विद्यार्थ्यांना एकत्र करून त्यांच्याकडून या विषयावरील उपाय, सूचना व शिफारसी मागविता येणे शक्य आहे. त्यामधून अनेक अत्यंत महत्वपूर्ण अशा प्रकारच्या उपाय किंवा सूचनांची निवड करता येईल.

६) शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये तत्वज्ञान या विषयाची माहिती देणे आणि स्पर्धांचे आयोजन करणे.

शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी महाविद्यालय–शाळा समन्वय समिती (School-College Bridge) स्थापन करुन त्या माध्यमातून शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन

विद्यार्थ्यांमध्ये तत्वज्ञान विषयाची बिजे रुजविण्यासाठी व्याख्याने, स्पर्धा, भित्तिचित्रे, प्रश्नमंजुषा इ. चे आयोजन करावे. तसेच या समितीमार्फत विविध शाळांमधील ग्रंथालयांना तत्वज्ञान विषयाच्या मुलभूत माहितीची पुस्तके भेट देण्यात यावीत. तसेच ज्या महाविद्यालयांमध्ये तत्वज्ञान हा विषय शिकविला जातो त्या महाविद्यालयांमध्ये तत्वज्ञान विषयक सादरीकरण स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन केल्यास विद्यार्थ्यांमध्ये विषयाची समज वाढण्याबरोबरच आत्मविश्वास, सादरीकरण कौशल्य, लेखनकौशल्य, तार्किक विचारक्षमता यासारख्या गुणांचा विकास होवू शकतो, हे सर्व या विषयाच्या वाढीला निश्चितपणे पूरक ठरु शकेल.

७) शालेय पाठयपुस्तकामध्ये विख्यात तत्वचिंतकांसंबंधी धडा अंतर्भूत करणे.

तत्वज्ञान या विषयाची विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण करण्यासाठी व त्या विषयाची तोंडओळख विद्यार्थ्यांमध्ये होण्यासाठी इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांच्या इतिहास किंवा भाषा विषयामध्ये तत्वज्ञान विषयाच्या तोंडओळखीसाठी काही अध्याय पाठयपुस्तकात सामील करण्यासाठी दबाव गटाच्या माध्यमातून शिक्षण विभागाकडे पाठपुरावा केल्यास त्याचा तत्वज्ञान विषयासाठी लाभ होऊ शकतो.

८) तत्वज्ञान विषयाच्या व्यावहारीक उपयुक्ततेचा प्रसार करण्यासाठी कार्यपध्दती तयार करणे.

तत्वज्ञान हा विषय वेगवेगळया क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेच, परंतु त्यापलीकडे जीवनाच्या सर्वच क्षेत्रामध्ये तत्वज्ञानाच्या व्यापक व सर्वसमावेशक दृष्टीकोनामुळे लाभ होवू शकतो, अशी जाणीव निर्माण होण्यासाठी आणि तत्वज्ञानाच्या उपयुक्ततेचा प्रसार करण्यासाठी एक विशिष्ट कार्यपध्दती तयार करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी तत्वज्ञानाच्या तज्ञ अभ्यासकांनी यासंबंधीची एक माहितीपुस्तिका तयार करुन त्याचा सर्व तत्वज्ञानाचे प्राध्यापक, विद्यार्थी आणि इतर सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रसार होण्यासाठी जाणीवपूर्वक व नियोजनबध्द प्रयत्न करणे गरजेचे आहे.

उपरोक्त सूचविलेला कृतीआराखडा वास्तवात आणण्यासाठी शिक्षक–प्राध्यापकांची भूमिका निर्णायक ठरु शकते. तत्वज्ञानाच्या प्राध्यापकाला आपल्या विषयासंबंधी प्रेम असतेच तसेच तो विषय अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचला पाहीजे अशीही आस असते. परंतु विषयाचे प्रेम किंवा ओढ यापलिकडे हा विषय अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि महाविद्यालय स्तरावर मोठया संख्येने हा विषय विद्यार्थ्यांनी निवडण्यासाठी नियोजनबध्द प्रयत्नांची गरज आहे. त्यासाठी तीव्र स्वरुपाची ईच्छाशक्ती हवी. आपण तत्वज्ञानाचे सर्व प्राध्यापक या विषयाची व्याप्ती अधिकाधिक वाढविण्यासाठी ज्याप्रमाणात कृतीप्रवण होवू त्याप्रमाणात हा विषय लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.